स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्याचे अनुदान राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१६/प्र.क्र.५/नवि-३४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक: १९ जानेवारी, २०१६.**

**वाचा:**

१) केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाचे आदेश क्रमांक १/८/२०१५-SBM, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वभाअ-२०१५/प्र. क्र. २३/नवि-३४, दिनांक २४.०४.२०१५
३) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वभाअ-२०१५/प्र. क्र. २३/नवि-३४, दिनांक १५.०५.२०१५
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पूरक-२०१५/ प्र.क्र.२०१/ अर्थसंकल्प-३, दिनांक ०१.०१.२०१६
५) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्र. बीयुडी- १४१६/ प्र.क्र.१/नवि-४, दिनांक ०६.०१.२०१६

**शासन निर्णय:**

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे, शहरातील गरीब आणि महिलांच्या आरोग्य विषयक व स्वच्छतेविषयक बाबींकडे विशेष लक्ष केंद्रित करून सर्व नागरिकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची आणि या शहरामधील नागरीकांना घरगुती शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने केंद्र शासनाने “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” ची अंमलबजावणी सुरु केली आहे. या अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये उपरोक्त उद्देशाने “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविण्यास संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये सुरुवात झाली असून या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी नगर विकास विभागांतर्गत स्वतंत्र स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालय निर्माण करण्यात आले आहे.

२. केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्यासाठी उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथील आदेशान्वये रुपये ४४.६० कोटीचा निधी वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामासाठी वितरीत केला आहे.

**३.** केंद्र शासनाने वितरीत केलेला रुपये २००.०० कोटीचा व निधी व राज्य हिस्सा म्हणून रुपये २६१.०० कोटीचा निधी अर्थसंकल्पीत करण्यासाठी सन २०१५ च्या तिसऱ्या अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती.

**४.** दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षाच्या विनियोजनांमध्ये समाविष्ट करण्यासाठी, पुरवणी विनियोजन विधेयकास मा. राज्यपालांनी संमती दिली आहे आणि ते महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४ दिनांक २१ डिसेंबर, २०१५ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले असल्याचे संदर्भातील क्रमांक ४ येथील दिनांक १.१.२०१६ शासन परिपत्रकान्वये वित्त विभागाने कळविले असून, सन २०१५ च्या तिसऱ्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे मंजूर झालेल्या तरतूदी संबंधित विभागांना वितरीत केल्या आहेत. तर, संदर्भीय क्रमांक ५ येथील नगर विकास विभागाच्या दिनांक ६.१.२०१६ च्या परिपत्रकान्वये पूरवणी मागण्यांमधील तरतूदी संबंधित प्रशासकीय कार्यासनाकडे सूपूर्द करण्यात आल्या आहेत.

**५.** त्यानुसार, स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५ च्या तिसऱ्या अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीपैकी रू १२८.४६६९ कोटी (केंद्र हिस्सा- रूपये ४४.६० कोटी व राज्य हिस्सा- ८३.८६६९ कोटी) एवढा निधी राज्यातील नागरी स्वराज्य संस्थांना वैयक्तीक घरगुती शैचालय बांधकामासाठी पुढील प्रमाणे वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. सदरचा खर्च संबंधित लेखाशिर्षासमोर दर्शविल्याप्रमाणे त्या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदी मधून भागविण्यात यावा.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीत करण्यात आलेली निधी रूपये |
|---|---|---|
| अ) | महानगरपालिकांना | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (७६) स्वच्छ भारत अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य (केंद्र हिस्सा ७५%), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७५२) योजनांतर्गत | १८,६३,५४,०००/- (रूपये अठरा कोटी त्रेसष्ट लक्ष चोपन्न हजार फक्त.) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (७७) स्वच्छ भारत अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७६१) योजनांतर्गत | ३१,९३,७६,०००/- (रूपये एकतीस कोटी त्र्याणव लक्ष शहात्तर हजार फक्त.) |

| अ. क्र. | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीत करण्यात आलेली निधी रूपये |
|---|---|---|
| ब) | नगरपरिषदांना | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (७८) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपरिषदांना सहाय्य (केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७७९) योजनांतर्गत | २४,४६,४६,०००/- ( रूपये चोवीस कोटी शेहचाळीस लक्ष शेहचाळीस हजार फक्त.) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (७९) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपरिषदांना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७८८) योजनांतर्गत | ४८,९२,९३,०००/- ( रूपये अठ्ठेचाळीस कोटी ब्याण्णव लक्ष त्र्याण्णव हजार फक्त.) |
| क) | नगरपंचायतींना | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९३, नगरपंचायतींना सहाय्य, (००) (०३) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपंचायतींना सहाय्य (केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७९७) योजनांतर्गत | १,५०,००,०००/- ( रूपये एक कोटी पन्नास लक्ष फक्त.) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९३, नगरपंचायतींना सहाय्य, (००) (०४) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपंचायतींना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९८०३) योजनांतर्गत | ३,००,००,०००/- ( रूपये तीन कोटी फक्त.) |

**६.** सदर निधी आहरित करण्यासाठी राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर रकमेचे देयक तयार करून ते अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडे तात्काळ सादर करून सदर निधी आहरित करून धनादेश प्राप्त करून घेण्यात यावा. सदर निधीचे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय वाटप शासन स्वतंत्र आदेशान्वये करून देईल, त्यानुसार या निधीचे वितरण संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना करण्याची कार्यवाही राज्य अभियान संचालकांनी करावी.

**७.** सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: अनौ. ०५/व्यय-३, दिनांक ०७/०१/०१६ व अनौ. २३/अर्थोपाय, दि. ११/१/२०१६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९११०८५६२२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2016.01.19 11:25:53 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
६. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई.
७. सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१०. मुख्याधिकारी नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
११. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२. अधिदान व लेखाधिकारी, फोर्ट, मुंबई.
१३. अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१६. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१७. उप सचिव (नवि-४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. उप सचिव (नवि-५), रोख शाखा, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवडनस्ती, नवि-३४.